TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालयः- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल: publichealth@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./१३३ /२०२६-२७ दिनांकः- ३०/०४/२०२६.

## // जाहीर सूचना//

**राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम (NTEP), 15 वा वित्त आयोग (नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत ठोक मानधनावरील रिक्त पदे भरणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दि. १६/०४/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या पदभरती जाहिर सुचनेच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की, इच्छुक व जाहिरातीत नमूदनुसार शैक्षणिक व इतर अर्हतेची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी जाहिराती सोबत जोडण्यात आलेल्या विहित नमुन्यातील अर्जामध्ये सर्व माहिती भरुन सोबत आवश्यक कागदपत्रे जोडून प्रत्यक्ष/टपालाने अर्ज दि.०४/०५/२०२६ सायं. ०५.०० वाजेपर्यंत सार्वजनिक आरोग्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे-४०११०१ येथे जमा करावेत. तसेच जाहिरातीतील गुगल फॉर्म लिंकमध्ये देखील माहिती भरणे अनिवार्य आहे.

- ज्या उमेदवारांनी फक्त गुगल फॉर्म लिंकमध्ये माहिती भरली आहे, परंतु विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रे अद्यापर्यंत सार्वजनिक आरोग्य विभाग कार्यालयात जमा केलेले नाहीत त्यांनी दि.०४/०५/२०२६ सायं. ०५.०० पर्यंत सादर करावेत.
- तसेच ज्या उमेदवारांनी फक्त विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत, परंतु गुगल फॉर्ममध्ये माहिती भरलेली नाही आशा उमेदवारांनी देखील दि.०४/०५/२०२६ सायं. ०५.०० पर्यंत गुगल फॉर्ममध्ये माहिती भरावी.
- विहित मुदतीनंतर प्रत्यक्ष/टपालाने अर्ज सादर केल्यास स्वीकारण्यात येणार नाहीत.
- तसेच फक्त गुगल फॉर्म लिंकमध्ये माहिती भरली आहे म्हणजे अर्ज सादर केला आहे असा अर्थ होत नाही. तरी उपरोक्त सुचनांची नोंद घ्यावी.
- **ज्या उमेदवारांनी गुगल फॉर्म लिंकमध्ये माहिती भरुन विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कार्यालयात सादर केली आहेत त्या उमेदवारांना सदरची सूचना लागू होत नाही.**

(कविता बोरकर)
उपायुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका